वाचले.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७२

२) परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/७८९/२०१३ दि.२१/११/२०१३.

३) मा.आयुक्तसो यांनी मान्य केलेला दि.६/०१/२०१४ चा प्रस्ताव.

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
जा.क्र.नासुके/१/कावि/ ९७ /२०१४
दि. ०६ /०१/२०१४

**विषय :- "नागरिकांची सनद" प्रसिध्द करणेबाबत. . .**

**आदेश,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने **"नागरिकांची सनद"** दर्शनी / ठळक जागी त्वरीत लावणे आणि त्याची प्रत नागरिकांनी मागणी केल्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सर्व विभागांची **"नागरिकांची सनद"** समान असावी व नागरिकांना सहज समजावी म्हणून नमुना तयार करणेत आला होता. **"यशदा"** व **"जनवाणी"** या संस्थांच्या अभिप्रायाप्रमाणे अंतिम केला आहे. सोबत परिशिष्ठ 'अ' मधील विभागांना, अंतिम करणेत आलेल्या नमुन्याप्रमाणे **"नागरिकांची सनद"** तयार करणेबाबत वाचले क्र.२ चे परिपत्रकान्वये कळविणेत आले आहे. संबंधित विभागांनी सनद अंतिम करणेत आली आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ७२ नुसार सोबत परिशिष्ठ 'अ' मधील विभागांची **"नागरिकांची सनद"** प्रसिध्द करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे. **"नागरिकांची सनद"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित कालमर्यादेत प्रकरणांचा निपटारा न केल्यास ज्या स्तरावर प्रकरण प्रलंबित असेल त्या स्तरांवरील अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कलम ७२ क नुसार कार्यवाही संबंधित विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी करावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ७२ च्या तरतुदीन्वये प्रसिध्द करणेत आलेली **"नागरिकांची सनद"** ही शासन तथा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सुधारित धोरण, योजना, नियम किंवा आदेश इत्यादीनुसार आवश्यकता भासल्यास वेळोवेळी तसेच प्रत्येक अनुवर्ती वर्षाच्या २ मे रोजी प्रत्येक विभागाकडून अद्ययावत करण्यात यावी. सर्व संबंधित विभागांनी, नागरिकांची सनदेत हरकती किंवा सूचना असल्यास, त्यानुसार नागरिकांची सनद अद्ययावत करावयाची झाल्यास परिपूर्ण प्रस्तावाव्दारे मा.आयुक्त यांची मान्यता घेऊन **"नागरिकांची सनद"** अद्ययावत करावी.

संबंधित विभागांनी **"नागरिकांची सनद"** प्रसिध्दीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही १० दिवसात करावी.

१. मान्यता दिलेल्या विभागांनी **"नागरिकांची सनद"** चा इंग्रजीत अनुवाद १० दिवसात करावा.

२. मान्यता दिलेल्या **"नागरिकांची सनद"** मराठी व इंग्रजी मध्ये हार्ड व सॉफ्ट कॉपी स्वरुपात नागरी सुविधा केंद्रास एक प्रत द्यावी.

३. नियंत्रणाखालील उपविभाग / प्रभाग कार्यालय येथे **"नागरिकांची सनद"** एक प्रत उपलब्ध करुन द्यावी.

४. मुख्य कार्यालय व त्यांच्या अखत्यारित उपविभाग / प्रभाग कार्यालय या ठिकाणी **"नागरिकांची सनद"** उपलब्ध असलेचे फलक लावावेत.

५. **"नागरिकांची सनद"** नागरिकांनी मागणी केल्यास त्याची प्रत पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

**(डॉ.श्रीकर परदेशी)**
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / शाखाप्रमुख
सर्व संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रत,

१) मा.आयुक्त कक्ष,
२) मा.अति.आयुक्त कक्ष,
३) प्रशासन विभाग,
४) माहिती व जनसंपर्क विभाग,
} माहितीसाठी

५) ई गव्हर्नन्स विभाग.,
२/-प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संबंधित विभागांची नागरिकांची सनद महानगरपालिकेच्या वेबपोर्टलवर प्रसिध्द करावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
आदेश क्र.नासुके/१/कावि/ ९१ /२०१३ दि.०६ /०१/२०१४ चे लगत
परिशिष्ठ अ

**"नागरिकांची सनद"**

| अ.क्र. | विभाग |
|---|---|
| १ | करआकारणी व करसंकलन |
| २ | पाणीपुरवठा |
| ३ | जलनि:सारण |
| ४ | नगररचना व विकास |
| ५ | अतिक्रमण |
| ६ | आरोग्य (मुख्य / प्रभाग कार्यालय) |
| ७ | उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग |
| ८ | विद्युत मुख्य कार्यालय / प्रभाग कार्यालय |
| ९ | सर्व प्रभाग स्थापत्य |
| १० | स्थानिक संस्था कर |
| ११ | आकाशचिन्ह व परवाना |
| १२ | वैद्यकिय विभाग |
| १३ | शिक्षण मंडळ |
| १४ | माध्यमिक शिक्षण विभाग |
| १५ | क्रीडा विभाग |
| १६ | झो.नि.पु. विभाग |
| १७ | पशुवैद्यकिय विभाग |
| १८ | अग्निशामक |
| १९ | नागरवस्ती विकास व योजना |
| २० | विवाह नोंदणी सर्व प्रभाग |
| २१ | प्रेक्षागृहे |
| २२ | सार्वजनिक वाचनालय |
| २३ | भुमी आणि जिंदगी मुख्य कार्यालय / प्रभाग कार्यालय |
| २४ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी |

(डॉ.श्रीकर परदेशी)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.